



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६५४. वा | बुधवार | दि. १७ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# आरोग्य खात्यात केवळ चौकशांचा बनाव, कारवाई शून्य भ्रष्टाचाऱ्यांना वरिष्ठांकडून मिळतेय अभय?...

## आरोग्य विभागास अर्थपुर्ण कुंभकर्णी झोपेतून आम्ही जागे करणार...

## जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणातील विविध तक्रारी आज पावतो आलेला विविध निधी कागदोपत्री कुठे व कसा खर्च झाला सविस्तर माहिती पुढील प्रत्येक पोस्टमार्टम सत्रात...

### पोस्टमार्टम ६१

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालय असो की, जिल्हा स्त्री रुग्णालय, या सगळ्या ठिकाणी आज मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. या भ्रष्टाचारासंदर्भात दबाव आल्यानंतर काही चौकशी समितीकडून पाहणीही झाली आहे. मात्र, समिती केवळ येते, चौकशी करून जाते, कारवाई मात्र शून्य असल्याचा प्रकार सातत्याने घडत आहे. हे नेमके काय गौडबंगाल आहे, याबाबत आता मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालयात करोडो रुपयांचा बोकाळलेल्या भ्रष्टाचार व अनागोंदी कारभारावर प्रकाश टाकण्याचे काम करीत आहे. या ठिकाणी होत असलेल्या भ्रष्टाचाराचे सप्रमाण वार्तांकनही केले जात आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्याच पुढाकारामुळे आज विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारीही या भ्रष्टाचाराच्या विरोधात उभे ठाकल्याचे दिसत आहे. या सर्व दबावामुळे काही महिन्यांपूर्वी एक चौकशी समिती देखील जिल्हा रुग्णालयात येऊन गेली. या समितीच्या समोर सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनसह विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आपले म्हणणे मांडले. भ्रष्टाचाराचे पुरावे देखील सादर करण्यात आले. मात्र, वारंवार चौकशी होऊन देखील या चौकशांचे अहवाल सातत्याने गुलदस्त्यातच राहतात. चौकशी समितीच्या अहवालावर पुढे काहीही कारवाई होत नसल्या कारणाने या चौकशांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अनेक तक्रारकर्ते सातत्याने त्यांनी केलेल्या तक्रारीवर काय कारवाई झाली, याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांना कसलेही उत्तर दिले जात नाही.

**करोडो रुपयांच्या भ्रष्टयाचार प्रकरणातील तत्कालीन रोखपाल पी.के.माळी यांनी अदा केलेल्या रक्कमा रोखपाल विभागाचा कार्यभार न देता व आर.एस.लाकडे यांनी न घेता तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकानी नियमबाह्य पदभार देऊन जो करोडो रुपयांचा गौडबंगाल केला त्याचे पोस्टमार्टम पुढील सत्रात**

काही महिन्यांपूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयात विविध उपकरणे व सामुग्रीत झालेल्या हेरफेर संदर्भात लेखा संचालकांमार्फत चौकशी करण्यात आली. त्या चौकशीत स्पष्टपणे जिल्हा सामान्य रुग्णालयात अनियमितता झाल्याचे उघड झाले होते. गैरव्यवहाराचा स्पष्ट उल्लेख असलेला हा अहवाल आयुक्त आरोग्य सेवा यांना सादर झाला होता. खरे तर या गंभीर ताशेरे असलेल्या अहवालावरून तात्काळ कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, यासंदर्भात अद्याप कोणावरही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. यावरून स्पष्ट आहे की, आरोग्य विभागात भ्रष्टाचाऱ्यांना




वाचवण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत आहे. आज महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सदस्य, अधिकारी हे शासन आपल्या दारी यासारखे उपक्रम राबवून शासनाच्या योजनांची भलामण करीत आहेत. त्यासाठी भव्य-दिव्य स्वरूपात कार्यक्रम घेतले जात आहेत.

उर्वरित पान २ वर...

## उसनवारीच्या पैश्यांच्या वादावरून पती पत्नीस मारहाण

**जनसंचलन/ खामगाव**

शहरालगतच्या जुनी वाडी येथे उसनवारीचे पैशातून वाद घालत पती-पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी एकावर गुन्हे दाखल केले. तर परस्परविरोधी तक्रारीवरून दुसऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. ही घटना सोमवारी घडली. याप्रकरणी दत्ता भास्कर जवंजाळ (३०) यांनी पोलिसात तक्रार दिली. त्यामध्ये सोमवारी दुपारी ५ वाजताच्या सुमारास नागेश मधुकर जवंजाळ (३३) याने वाद घालून शिवीगाळ केली. लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले, जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी त्यांची पत्नी मध्यस्थी करण्यासाठी आली असता तिही सुद्धा नागेश जवंजाळ याने लोटपाट केली. तसेच दुचाकीला दगड मारून नुकसान केल्याचे तक्रारीत म्हटले. याप्रकरणी शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ नुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास एएसआय बळीराम वरखडे करीत आहेत. तर नागेश मधकर जवंजाळ यांनीही तक्रार दिली. त्यामध्ये दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास त्याची आई दत्ता भास्कर जवंजाळ याच्याकडे उसने दिलेले पैसे मागण्यासाठी गेली, त्याने पैसे नाहीत, असे म्हणून शिवीगाळ केली.




यावेळी मध्यस्थी करण्यासाठी गेला असता त्यांना कुऱ्हाडीचा दांडा व दगड मारून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले. याप्रकरणी नागेश जवंजाळ यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोहेकॉ गजानन पाटील करीत आहेत.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# सुरजागड इस्पात करणार १०,००० कोटींची गुंतवणूक

## गडचिरोलीत ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्लांट

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातत्याने केला पाठपुरावा



**वृत्तसंस्था/मुंबई**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्याने पाठपुराव्याला यश आले असून, सुरजागड इस्पात प्रा. लि. ने गडचिरोलीत ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्रकल्प स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी ते १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत. विदर्भ विशेषत: गडचिरोलीसाठी ही मोठी उपलब्धी आहे. सुरजागड इस्पात प्रा. लि.चे अध्यक्ष सुनील जोशी यांनी आज सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली आणि यावेळी याबाबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाली. या प्रकल्पाच्या माध्यमातून ८००० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. या प्रकल्पात जागतिक दर्जाचे उत्पादनविषयक तंत्रज्ञान राहणार असून, पर्यावरण रक्षण हा त्याचा मुख्य गाभा असेल. त्यामुळे हा संपूर्णत: पर्यावरणपूरक स्टील प्रकल्प राहणार आहे, अशीही माहिती यावेळी सुनील जोशी यांनी दिली. गडचिरोलीच्या सर्वांगिण विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असून, या भागात रोजगार निर्मितीसाठी सुद्धा सातत्याने प्रयत्न होत आहेत. गडचिरोली हे देशाचे पोलाद हब होण्याची क्षमता आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी सर्वतोपरी मदत राज्य सरकारतर्फे करण्यात येईल, अशी हमी यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सुनील जोशी हे दावोस परिषदेत सुद्धा सहभागी होणार असून, तेथे ते राज्य सरकारसोबत सामंजस्य करार सुद्धा करणार आहेत. गडचिरोलीत विविध पायाभूत सुविधा प्रकल्प आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणूक यावी, यासाठी नेहमीच देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार राहिला आहे. कोनसरी येथे एका प्रकल्पाचे उदघाटन आणि दुसर्या टप्प्याचे भूमिपूजन सुद्धा लवकरच होणार आहे. फडणवीस मुख्यमंत्री असताना या कोनसरी प्रकल्पाची पायाभरणी झाली होती. आता या नव्या गुंतवणुकीतून गडचिरोली आणि पर्यायाने विदर्भाच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

# पान १ वरून आरोग्य खात्यात केवळ चौकशांचा बनाव...

आपले शासन कसे नि:पक्षपणे आणि पारदर्शी कामकाज करीत आहे, याचा गाजावाजा केला जात आहे. या कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात शासकीय यंत्रणेचा वापर केला जात आहे. एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे आरोग्य आयुक्तांकडे दोन-दोनदा जिल्हा रुग्णालयात गैरप्रकार झाल्याचे अहवाल पोहोचल्यानंतरही आयुक्त कार्यालयाकडून कोणतीही कारवाई का होत नाही, असा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. या प्रकारावरून हे स्पष्ट आहे की, आरोग्य विभागातील भ्रष्टाचार्‍यांना जाणुनबुजून वाचवण्याचे प्रयत्न होत आहेत. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे सातत्याने बाहेर काढत आहे. जिल्हा रुग्णालयात कोरोना महामारीच्या आधीपासून प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. दुसरीकडे रुग्णालयात प्रचंड अनागोंदी माजली आहे. कोरोना महामारीच्या काळात या ठिकाणी भ्रष्टाचाराने अक्षरशः टोक गाठले होते. तोच कित्ता आजही गिरवला जात आहे. कॅशबुकातील खाडाखोड करून केलेला भ्रष्टाचार, अनेक प्रकारच्या उपकरणे व औषधीतला भ्रष्टाचार, डॉक्टरांची मनमानी, विविध प्रकारे येथे येणार्‍या रुग्णांची होणारी लुबाडणूक, अशी अनेक प्रकरणे आजवर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने उजेडात आणली आहेत. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनीही जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचारावर थेट विधान सभेत दोन वेळा आवाज उठवला होता. परंतु त्यासंदर्भात देखील पुढे काय कारवाई झाली, हे स्पष्टपणे दिसून येत नाही. या ठिकाणी आजवर येऊन गेलेल्या अनेक जिल्हा शल्यचिकित्सकांनी भ्रष्टाचाराचे कुरण म्हणूनच जिल्हा रुग्णालयात कामकाज केले. डॉक्टरांची खासगी रुग्णसेवा हा तर या ठिकाणचा एक गंभीर मुद्दा बनलेला आहे. मात्र, कोणत्याही विषयावर आज कारवाई होताना दिसून येत नाही. काही दिवसांपूर्वी जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक सचिन वासेकर हे तर चक्क लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात अडकले होते. यावरून जिल्ह्याच्या आरोग्य विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची व्याप्ती किती आहे, हे स्पष्टपणे समोर येते. राज्याचे आरोग्यमंत्री तथा आरोग्य आयुक्तांनी यासंदर्भात तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन देखील सातत्याने त्या दिशेने प्रयत्न करीत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणार्‍या व भ्रष्टाचारातून करोडो रुपयांनी स्वतःच्या तुंबड्या भरणार्‍यांवर जोपर्यंत कठोर कारवाई होत नाही, त्यांनी भ्रष्ट्याचारातून कमवलेली करोडो रुपयांची संपत्ती / अपसंपदा शासन तिजोरीत जमा करून त्यांच्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कार्यरत राहील व भ्रष्टाचार्‍यांचे बुरखे फाडतच राहील, हे नक्की.

# जीव धोक्यात घालणाऱ्या कोविड योद्धांच्या उपोषणाची आ. सौ श्वेताताई महाले यांच्या हस्ते सांगता...

**जनसंचलन/बुलढाणा**

कोविड महामारीच्या काळामध्ये स्वत:चा जीव धोक्यात घालून कंत्राटी पद्धतीने अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या कोविड रुग्णालयातील कामगारांचे मानधन मिळण्यासाठी गत सात दिवसापासून उपोषणास बसलेल्या कामगारांच्या उपोषणाची सांगता आ. सौ श्वेता ताई महाले यांच्या हस्ते करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालया अंतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कार्यालयात कोविड कंत्राटी सेवेमध्ये माहे १ एप्रिल २०२२ ते नोव्हेंबर २०२२ पर्यंत चे ४१ लोकांचे मानधन अद्यापही सदर कार्यालयाने दिलेले नाही , या मानधना बाबत जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कडे सतत पाठपुरावा करूनही प्रशासन या बाबतीत उदासीन होते व मानधन या कर्मचाऱ्यांना मिळावे यासाठी कोणतीही हालचाल करत नव्हते म्हणून दिनांक १० जानेवारी २०२४ पासून सदर कर्मचारी आमरण उपोषणाला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले होते. तब्बल सात दिवसापासून उपोषणास बसलेले उपोषण कर्त्यांची प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याने सौ श्वेता ताई महाले यांनी स्वतः उपोषण मंडळात भेट दिली . जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ सुभाष चव्हाण यांना उपोषण मंडपात बोलावून घेतले. जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे या उपोषणकर्त्यांची समस्या सांगितली. त्यावर जिल्हाधिकारी यांनी विशेष बाब म्हणून मानधनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची अटीवर




उपोषणकर्त्यांनी उपस्थित सोडण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे दिनांक १६ जानेवारी २०१४ रोजी मा.आमदार श्वेताताई महाले पाटील यांच्या मध्यस्तीने कोरोना योद्धा यांच्या जिल्हाधिकारी कार्यालय समोर मागील ७ दिवसापासून बसलेल्या उपोषणाची सांगता करण्यात आली . त्यामुळे सर्व कोरोना योद्धा यांनी सौ श्वेता ताई महाले यांचे आभार मानले व मानधन लवकर मिळेल अशी आशा व्यक्त केली यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष मोहन पवार माजी तालुकाध्यक्ष सुनील देशमुख शिवसेना उपजिल्हाप्रमुख रोहित खेडेकर , संदीप उगले , विनायक भाग्यवंत अरविंद होंडे , यावेळी उपोषण कर्ते गजानन सावरकर, विजय चव्हाण ,संदीप पवार ,यश चिटवार, शेख शाहरुख ,कृष्णराव देशमुख अंकुश शेळके ,विठ्ठल ढापसे ,रवी ढापसे , शेख इम्रान ,गजानन बोरखडे ,जीतून राऊत शेख परवेज व इतर यांनी उपोषण सोडले

मराठा महिला अर्बन
को-ओपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा
मराठा महिला अर्बन
पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com
तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क
सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)
मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वरवंड येथील दिव्य सेवा प्रकल्प देतोय मनोरुग्णांना साथ!...

जनसंचलन/ साखरखेर्डा

दिव्या फाउंडेशन अंतर्गत दिव्यसेवा प्रकल्प वरवंड बुलढाणा हे नेहमी मनोरुग्ण, बेघर, वृद्धांना मदत करीत असते आतापर्यंत १००० च्या जवळपास पूर्ण भारतभर त्यांनी मनोरुग्ण असो बेघर असो या सर्वांचे पुनर्वसन करून त्यांच्यावर उपचार करून जोपर्यंत मनोरुग्ण बरा होत नाही आणि स्वतः घरी जायचे म्हणत नाही तोपर्यंत ते काळजी घेतात. खरोखरच माणसातला देव ओळखण्याची गरज उरली आहे. तसेच पुरुषोत्तम मानतकर यांच्या माध्यमातून शारा (लोणार) येथील नेहा ढवळे हिला या प्रकल्पामध्ये दाखल केले ती सुद्धा थोड्या प्रमाणात मनोरुग्ण होती परंतु दिव्य सेवा प्रकल्पाचे अध्यक्ष अशोक भाऊ काकडे यांनी नेहाला अवघ्या ४२ दिवसात आजारातून बरे केले. नेहाला शारा येथील घरी सोडण्यात आले. यावेळी दिव्य फाउंडेशनचे अध्यक्ष अशोकभाऊ काकडे, पुरुषोत्तम मानतकर (जिजामाता हायस्कूल), दर्शनकुमार गवई, विशाल ग्यारल, संदेश वानखेडे इत्यादी हजर होते



# रामदेवबाबांना अटक करा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे आंदोलन

जनसंचलन/ खामगाव



रामदेव बाबा यांना तत्काळ अटक करावी या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने येथे आंदोलन करण्यात आले. ओबीसी समाजाची ऐसी तैसी उच्चारुण ओबीसी समाजाचा अपमान करणाऱ्या रामदेव बाबा यांना तत्काळ अटक करावी या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने आज खामगावात येथे आंदोलन करण्यात आले. काही दिवसांपासून समाज माध्यमांवर रामदेवबाबा यांची एक क्लिप सार्वत्रिक होत आहे. त्यामध्ये ते स्वतःला अग्निहोत्री ब्राह्मण म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत असून ओबीसी समाजाचा अपमान करीत असल्याचे दिसत आहे. यामुळे राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे रामदेवबाबा यांच्या विरोधात आज राष्ट्रीय ओबीसी महासंघाकडून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने व निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी रामदेव बाबांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले.

# मोताळ्यात रस्त्यांसाठी ५० कोटीचा निधी- आमदार संजय गायकवाड

जनसंचलन/मोताळा



बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांचा विकासाचा रथ भरधाव वेगाने धावत असून नुकताच त्यांनी मोताळा तालुक्यातील परडा फाटा ते ईसालवाडी व बोराखेडी फाटा ते आव्हा या मुख्य रस्त्यांना २ पदरी जोडणाऱ्या रस्त्यांसाठी ५० कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री यांच्या विशेष सहायता निधीमधून मंजूर करून आणला आहे. बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आ. संजय गायकवाड यांच्या विकास कामाची चर्चा केवळ मतदार संघातच नव्हे जिल्ह्यातच नव्हे त्या संपूर्ण महाराष्ट्रभरात होत असून करोडो रुपयांचा निधी त्यांनी मतदारसंघांमध्ये खेचून आणला आहे. नुकताच त्यांनी मोताळा तालुक्यातील २ रस्त्यांसाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. त्यामध्ये परडा फाटा, परड़ा शिरवा धामणगाव देशमुख रामगाव तांडा, गिलोरी फाटा पिंपळगाव नाथ चिंचखेड नाथ इ शाल वाडी या गावासाठी २५ कोटी रुपयाचा निधी तर बोराखेडी, औं फाटा वडगाव काबरखेड, सारोळा पीर, पोफळी टाकळी, घडेकर, कोल्ही गवळी, आव्हा या गावाला जोडणाऱ्या रस्त्यांसाठी २५ कोटी रुपयांचा निधी खेचून आणला आहे, विशेष म्हणजे मा. मुख्यमंत्री यांच्या विशेष निधीमधून त्यांनी हा निधी प्राप्त केला आहे, परडा ते पिंपळगाव नाथ, व, बोराखेडी ते कोली गवळी हे दोन्ही रस्ते तालुक्यातील मुख्य रस्ते असून या रस्त्यांचा फायदा तालुक्यामध्ये दळणवळण वाढण्यास होईल, आ. संजय गायकवाड यांनी आपल्या कल्पक नेतृत्वातून व दूरदृष्टीने मतदार संघांमध्ये विकासाची गंगा जाणली असून मतदारसंघातील लहानात लहान गावांमध्ये करोडो रूपयांची विकासकामे सुरू आहेत. यामध्ये गावात विविध समाजासाठी प्रार्थना स्थळे, अंतर्गत रस्ते, विद्यार्थ्यांसाठी व्यायाम शाळा अभ्यासिका, पाझर तलाव, सिंचन तलाव, गावामधील करोड रुपयांच्या पाणीपुरवठा योजना, गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी विविध योजना आ. संजय गायकवाड यांनी खेचून आणले असून त्यांच्या कामगिरीमुळे तालुक्यातील प्रत्येक समाजातील घटक हा त्यांच्याकडे आकृष्ट झाला असून त्यांच्या नेतृत्वामध्ये शेकडो युवकांचे प्रवेश दररोज मतदार संघामध्ये होत आहे. सध्या स्थितीत तालूक्यातील अत्यंत महत्वाचे हे दोन्हीही रस्ते दुपदरी होणार असल्याने वाहतुकीसाठी तालुका वाशियांना आमदार, महोदयांनी नागरिकांना नविन वर्षीचे गिफ्ट दिलेले आहे.

# बुलडाणा शहर पोलिस स्टेशला मिळाले धडाकेबाज पोलिस निरीक्षक !

## शहर पोलीस स्टेशनच्या ठाणेदारपदी आता नरेंद्र ठाकरे तर प्रल्हाद काटकरांची सायबर पोलीस ठाण्यात बदली...

जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रल्हाद काटकर यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी ठाणेदार म्हणून नरेंद्र ठाकरे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. प्रल्हाद काटकर सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. पुढच्या महिन्यात ते सेवानिवृत्त होणार आहेत, त्याआधी त्यांच्यावर जिल्ह्यात नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सायबर पोलीस ठाण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने सर्वाधिक व्यस्त पोलीस स्टेशन अशी ख्याती असलेल्या बुलडाणा शहर पोलीस ठाण्याची जबाबदारी सांभाळण्यासाठी खमक्या डॅशिंग धडाकेबाज अधिकाऱ्याची गरज होती. महिनाभरापूर्वी खामगाव शहर पोलीस स्टेशनच्या ठाणेदारपदी जबाबदारी स्वीकारणाऱ्या नरेंद्र ठाकरेंवर आता बुलडाणा शहर पोलिस स्टेशनच्या ठाणेदार पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. नरेंद्र ठाकरे यांनी अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार म्हणून कारकीर्द गाजवली होती. जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक म्हणूनही त्यांचा कार्यकाळ चांगला राहिला.



खामगाव शहरात अल्पकाळात दरारा निर्माण करण्यात ते यशस्वी झाले होते. आता बुलडाणा शहरचे ठाणेदार म्हणून ते कशी कामगिरी करतात याकडे साऱ्यांचे लक्ष राहील.

# लग्नाचे आमिष दाखवत महिलेवर केला लैगिंक अत्याचार

जनसंचलन/बुलढाणा

लग्नाचे आमिष दाखवत एका ४१ वर्षीय विवाहितेवर सातत्याने अत्याचार केल्याप्रकरणी बुलढाणा पोलिसांनी एकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. इप्सीत साध्य करण्यासाठी आरोपीने पीडित महिलेस तिचा व्हिडीओ समाजमाध्यमावर टाकण्याची धमकीही दिली होती. पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, जिल्ह्यातील एका पतसंस्थेत कार्यरत असलेल्या महिलेसोबत हा प्रकार घडला आहे. पीडित महिला घटस्फोटीत असून, दरम्यान, संकेत सुभाषचंद्र गावडे (३५, रा. बुलढाणा) असे आरोपीचे नाव आहे. २०१७ मध्ये पीडित महिलेची आरोपीसोबत ओळख झाली. त्यातून त्यांच्यात जवळीक निर्माण झाली. त्यातच आरोपीने नंतर पीडित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमुद आहे. हा प्रकार नंतर सातत्याने सुरू होता. दरम्यानच्या काळात त्यांच्या संबंधाची चित्रफीतही आरोपीने बनवल्याचे तक्रारीत आहे. जवळपास दोन वर्षांपासून हा प्रकार सुरू होता. दरम्यान, ८ जानेवारी रोजीही आरोपीने पीडितेला बाहेरगावाहून बोलावत तिच्यासोबत संबंध प्रस्थापित केले होते. चित्रफीत समाजमाध्यमावर व्हायरल करण्याची धमकी आरोपीने तिला दिली होती.



पीडितेने लग्नासाठी आरोपीसोबत आग्रह धरला असता आरोपीने त्यास नकार दिला. सोबतच तिला त्याने मारहाणही केल्याचे पिडित महिलेने तक्रारीत नमुद केल आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपीस अटक केली.

# शिंदे-नार्वेकरांनी माझ्यासोबत पोलीस संरक्षण न घेता जनतेत यावं, मग कळेल शिवसेना कुणाची : उद्धव ठाकरे

**वृत्तसंस्था/मुंबई**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी दिलेल्या निकालाची चिरफाड करण्यासाठी ठाकरे गटाने आज वरळी डोममध्ये जनता न्यायालयाचं आयोजन केलं होतं. या न्यायालयात ॲड. असीम सरोदे, ॲड अनिल परब, ॲड रोहित शर्मा यांनी बाजू मांडल्यावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार भाषण केलं. भाषणाच्या पहिल्याच मिनिटांत त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सणसणीत टोला हाणला. काल लबाडाने... लवादाने निकाल दिला... सुप्रीम कोर्टाने फाशीची शिक्षा दिल्यावर फाशी देण्याचं काम जल्लाद करतो. तेच काम सुप्रीम कोर्टाने अध्यक्षांकडे दिलेलं होतं. पण आता लोकशाही, सुप्रीम कोर्ट यांचं अस्तित्व देशात राहणार की नाही, हे ठरविण्याची वेळ आहे. एकनाथ शिंदे आणि राहुल नार्वेकरांनी माझ्यासोबत पोलीस संरक्षण न घेता जनतेत यावं, मग कळेल शिवसेना कुणाची, असं आव्हानच उद्धव ठाकरे यांनी दिलं. वरळी डोममध्ये पार पडलेल्या जनता न्यायालयाला उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, रश्मी ठाकरे, खासदार संजय राऊत, खासदार विनायक राऊत, खासदार अरविंद सावंत, उपनेत्या सुषमा अंधारे, सचिन अहिर यांच्यासह प्रमुख शिवसेना नेते उपस्थित होते. यावेळी न्यायालयात शिवसेनेची बाजू मांडलेले कायदेतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे आणि ॲड. रोहित शर्माही उपस्थित होते.उद्धव ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, सुप्रीम कोर्टाकडून आता शेवटची आशा आहे. लोकशाहीचा मूलभूत घटक असणाऱ्या जनतेच्या न्यायालयात आपण आलो आहोत. सरकार कोणाचंही असलं तरी, सत्ता ही सामान्य जनतेचीच असली पाहिजे! माझं आव्हान आहे. नार्वेकरांनी, मिंध्यांनी माझ्यासोबत जनतेमध्ये यावं आणि तिथं सांगावं शिवसेना कुणाची? मग जनतेने ठरवावं कोणाला पुरावा, गाडावा की तुडवावाशिवसेना जर तुम्ही विकली असाल; तर मी जिथे जिथे जातो, तिथे तिथे शिवसैनिक माझ्यासोबत कसे? असा सवाल करताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दुसरं चॅलेंज दिलं. जर आमचे आमदार अपात्र करण्याची तुमची मागणी पूर्ण झाली नाही आणि त्यामुळे तुम्ही नाराज होऊन कोर्टात गेलेला आहात तर ज्यांनी निकाल दिला त्याच विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास ठराव आणा, मी तुम्हाला पाठिंबा देतो.व्हीपचा अर्थ आहे चाबूक! चाबूक लाचारांच्या हातात शोभत नाही. शिवसेनाप्रमुखांच्या आणि शिवसैनिकांच्या हातात शोभतो! आपण निवडणूक आयोगावर एक केस करायला पाहिजे. आपण शपथपत्र आणि प्रतिज्ञापत्र लिहिली होती. मग सरकारने गाद्या पुरवल्या नाहीत, म्हणून निवडणूक आयोग त्यांना गाद्या समजून झोपलंय का? अशी सडकून टीका उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर केली.आपल्या देशात लोकशाही जिवंत राहणार की नाही, सुप्रीम कोर्ट अस्तित्वात राहणार, की लवाद त्याच्या डोक्यावर बसणार; हे पाहण्याची ही लढाई आहे. सुप्रीम कोर्टाचा आदेश सर्वोच्च मानायचा, की लबाडाचा आदेश सर्वोच्च मानायचा; ही लढाई उद्या होणार आहे. आमच्या पात्र अपात्रतेचा निर्णय माझी जनता घेईल; ते म्हणतील त्या दिवशी मी घरी बसेन, असं सांगतानाच लोकशाही जिवंत रहाणार आहे की नाही? अशी खंत उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.



# एकनाथ शिंदेंना भाजपसह बड्या उद्योगपतीच्या दबावामुळे मिलिंद देवरांना पक्षात घ्यावे लागले: संजय राऊत

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्लीचा दबाव आणि एका उद्योगपतीच्या सांगण्यावरुन मिलिंद देवरा यांना स्वत:च्या पक्षात प्रवेश द्यावा लागला, असा खळबळजनक आरोप खासदार संजय राऊत यांनी केला. एकनाथ शिंदे यांना सांगण्यात आले होते की, मिलिंद देवरा यांचा पक्षप्रवेश करुन घ्या. इतकंच नाही तर त्यांना राज्यसभेवर पाठवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले. ते मंगळवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत बोलत होते.यापूर्वी शिंदे गटात गेलेले काही लोक आमचा पक्ष, आमचा पक्ष, असे म्हणत असतात. अशा लोकांचं आता काय होणार? उद्योगपतींच्या दबावामुळए जर बाहेरुन आलेले लोक तुमच्या पक्षात ताबडतोब मोक्याच्या पदांवर जाणार असतील तर या गटाचं भविष्य काही खरं नाही, असे संजय राऊत यांनी म्हटले. राऊत यांच्या आरोपावर आता शिंदे गट आणि भाजपचे नेते काय प्रत्युत्तर देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार मिलिंद देवरा यांनी रविवारी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता. काँग्रेस हायकमांडने या गोष्टीची गंभीर दखल घेतल्याची चर्चा आहे. मुंबईतील काँग्रेसच्या नेत्यांकडून यासंदर्भात अहवाल मागवण्यात आल्याचेही सांगितले जाते. अयोध्येतील राम मंदिरासंदर्भात भाजप पक्ष कायम, मंदिर वही बनाऐंगे असा नारा देत आला आहे. मात्र, आता अयोध्येत जाऊन बघा. ज्या जागेवर राम मंदिर बांधलं जाणार होतं, तिथे प्रत्यक्षात मंदिराची उभारणी झालेली नाही. वादग्रस्त जागेपासून ४ किलोमीटर अंतरावर राम मंदिराची उभारणी सुरु आहे. त्यामुळे वादग्रस्त जागा अजूनही तशीच आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला. संजय राऊतांच्या या वक्तव्याचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाचार घेतला. राममंदिर आंदोलनात ज्यांचं काहीही योगदान नाही, असे लोक काहीही आरोप करुन स्वत:च हसं करुन घेत आहेत. कोट्यवधी हिंदूंचा अपमान करत आहेत. आतातरी उबाठा सेनेने हिंदू समाजाचा अपमान करणे बंद करावे,



# राज्यातील महायुतीचा फार्मूला ठरला.भाजपला ३२ तर घटक पक्षाला इतक्या जागा...

**वृत्तसंस्था/पुणे**

लोकसभेच्या निवडणुका जवळ येऊ लागल्यामुळे प्रत्येक पक्ष आपली जोरदार तयारी करत आहे. त्यात राज्यात महायुती व महाविकास आघाडी असा थेट सामना होणार असल्यामुळे यातील घटक पक्ष किती जागा लढणार यावर नेहमी चर्चा होते.



दरम्यान धक्कादायक फार्मूलाच आता समोर आला असून त्यात भाजप ३२, शिंदे गट १० व अजित पवार यांचा गट ६ जागा लढवणार असल्याचे बोलले जात आहे. आतापर्यंत आलेल्या फार्मूलामध्ये भाजप २६ तर शिंदे व अजित पवार गट २२ जागा लढवणार असल्याचे बोलले जात होते. पण, आता ४८ जागांपैकी ३२ जागा भाजपला लढवणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे फार्मूलामुळे शिंदे गट व अजित पवार गटांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. नेहमी महायुतीचा फार्मूला सांगतांना त्यांनी विद्यमान खासदारांना पुन्हा उमेदवारी देण्याची परंपरा असली तरी त्यांच्या एकुण कामाबाबत त्यावर चर्चा करुन निर्णय घेणार असल्याचे बोलले जात होते. त्यामुळे अनेक विद्यमान खासदारांची दांडी उडणार असल्याचे बोलले जात आहे. देशातील पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकालात भाजपने तीन राज्यात सत्ता मिळवली. त्यानंतर अयोध्या सोहळा व एकुणच मोदी सरकारने घेतलेले निर्णय यामुळे भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे भाजपने आपल्या जागा वाढवल्या असल्याचे बोलले जात आहे. एकुणच ही चर्चा खरी ठरल्यानंतर महायुतीचे नेते काय भूमिका घेतात हे महत्त्वाचे असणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958